RNI No. MAHBIL /2009/36619

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक–कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १२, अंक १८] बुधवार, मार्च १८, २०२६/फाल्गुन २७, शके १९४७ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ११.००

असाधारण क्रमांक २७

प्राधिकृत प्रकाशन

उप विभागीय अधिकारी, डहाणू ,उपविभाग डहाणू, जिल्हा-पालघर यांजकडून

भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ११(१) ची

अधिसूचना

क्रमांक पीएलएन-२०१६/सीआर-(६०२)/नि-३ मंत्रालय, मुंबई ४०००३२ नुसार पालघर जिल्हा, डहाणू तालुक्यातील पश्चिम रेल्वे लेव्हल क्रासिंग क्र.६१ कि.मी.१३४/१६-१८ घोलवड-कोसबाड कंक्राडी मल्याण ते रा.मा.३०(प्र.जि.मा.-६) विरार-सुरत रेल्वे मार्गावर रेल्वे उड्डाण पुलाचे बांधकाम करणे.

भूमीसंपादन ,पुनर्वसन व पुनर्वसाहत, करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) मधील कलम ३ च्या खंड (इ) च्याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकिर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२/दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे.) याद्वारे असे अधिसूचित केले आहे, उक्त अधिनियमाचा कलम ३ खंड (झेड अ) मध्ये व्याख्या केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टर अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात अशा जिल्ह्याचा अधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समूचित शासन असलेल्या पालघर जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त जमीन" असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त सार्वजनिक प्रयोजन" असा करण्यात आला आहे.) आवश्यक आहे. अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते. ज्याचे स्वरुपाचे विवरण या सोबत जोडलेल्या अनुसूची दोन मध्ये दिलेले आहे आणि म्हणूनच उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदी अन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमिसंपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तिंचे विस्थापन करण्यास भाग पडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची-तीन मध्ये दिलेली आहेत ;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील यासोबत जोडलेल्या अनुसूची, पाच मध्ये दिलेला आहे ;

त्याअर्थी, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ चा पोट-कलम (४) नुसार कोणतीही व्यक्ती ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतू, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमुद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल अशी तरतुद आहे.

परंतू, आणखी असेकी, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धिपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्याकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोटकलम (०५) नुसार जिल्हाधिकारी भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देशी "उक्त नियमन" असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम १० च्या उप नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्ययावती करण्याचे काम हाती घेणार असल्याचे व पुर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ चा खंड (छ) समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्य पार पाडण्यासाठी उप विभागीय अधिकारी, डहाणू उपविभाग, डहाणू यांस पदनिर्देशित केले आहे.

क्र. डीपी/भूसं/DFCC उड्डाणपुल/अधिसूचना ११(१)/कावि-१४/२०२६ दि. ९/०१/२०२६.

परिशिष्ट -१

डेडीकेटेड फ्रेट कॉरीडोर अंतर्गत सुरु असलेल्या रेल्वे उड्डाणपुलाच्या उर्वरीत जागेचे संपादनाकरीता प्रस्ताव
मौजे-घोलवड, ता.डहाणू, जि.पालघर

अ. क्र.	जिल्हा	तालुका	गाव	सर्व्हे नंबर	क्षेत्रफळ(हे.आर/चौ.मी.)
१	पालघर	डहाणू	घोलवड	१७८/अ पै, संगणक ७/१२ प्रमाणे १७८/७/१/५	०.०८.३७
				१७९/१पै संगणक ७/१२ प्रमाणे १७९/३/१	०.३०.८८
				३०२/२पै संगणक ७/१२ प्रमाणे ३०२/२	०.१२.३६
				१७६ पै संगणक ७/१२ प्रमाणे १७६/५/६	०.२७.९५
एकूण					**०.७९५६**

अनुसूची २

सार्वजनिक प्रयोजन स्वरुपात विवरण

प्रकल्पाचे नाव :	डीएफसीसी रेल्वे उड्डाणपुल
प्रकल्पाचे वर्णन :	डहाणू तालुक्याच्या हद्दीत मौजे-घोलवड, येथील एकूण संपादन क्षेत्र ०.७९५६ चौ.मी. चा प्रकल्प आहे
समाजाला मिळणारे लाभ :	रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. स्थानिक लोकांना त्यांचे कौशल्य आणि अनुभव यानुसार त्या जागेतील प्रचलित नियमानुसार रोजगाराच्या संधी मिळतील.

अनुसूची तीन

बाधीत व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे.

१. प्रकल्पाचे बांधकाम

२. प्रकल्पाचे परिचालन

३. प्रकल्पाची देखभाल.

या कारणाकरिता जमिनीची आवश्यकता आहे.

अनुसूची चार

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करण्याऱ्या अधिकाऱ्याने दिलेला सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश)

शासन निर्णय क्रमांक पीएलएन-२०१६/सीआर-(६०२)/नि-३ मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ नुसार पालघर जिल्हा डहाणू,तालुक्यातील पश्चिम रेल्वे लेव्हल क्रासिंग क्र.६१ कि.मी.१३४/१६-१८ घोलवड-कोसबाड कंक्राडी मल्याण ते रा.मा.३०(प्र.जि.मा.-६) विरार-सुरत रेल्वे मार्गावर रेल्वे उड्डाण पुलाचे बांधकाम करणे.

याद्वारे भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) यामध्ये कलम १० क समाविष्ट केले असून त्यामध्ये अशी तरतूद केली आहे की, समुचित शासनाला जनहिताच्या दृष्टीने अधिसूचनेद्वारे, उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोन व प्रकरण तीन यांच्या तरतुदी लागू करण्यापासून सुट देता येते. त्यानुसार **महाराष्ट्र शासन राजपत्र**, असाधारण क्रमांक ३०, दिनांक ३०/०१/२०२३ नुसार उक्त प्रकल्पाला जनहिताच्या दृष्टीने लोकहितकारी प्रकल्प असल्याकारणे, प्रकरण-दोन आणि प्रकरण-तीनच्या तरतुदी लागु करण्यापासून उक्त प्रकल्पाला सूट देण्यात आली आहे.

श्री. विशाल खत्री (भा.प्र.से.),
सक्षम प्राधिकारी तथा,
उप विभागीय अधिकारी,
डहाणू विभाग, डहाणू.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.